**निशाणी क्र.२६**

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – संतोष वासुदेव पवार,
वय – ५० वर्ष,
धंदा – फॅब्रिकेशन,
राहणार – येडगाव पवारवाडी, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.

**<u>शपथेवर सरतपास सरकार तर्फे सहाय्यक सरकारी वकिल श्री.ए.ए.उल्हाळकर, यांचे मार्फत–</u>**

१. दिनांक ०३.०४.२०२४ रोजी पोलीसांनी मला येडगाव, वैभववाडी येथील सुख नदीजवळ बोलविले होते. माइ–या सोबत नारायण रावराणे होते. पोलीसांनी मला दुपारी ०४.०० च्या सुमारास बोलविले होते. त्या ठिकाणी अपघात झाल्याने मला पंचनामा करण्याकरिता पोलीसांनी बोलविले होते. अपघातस्थळ हे वैभववाडी कोल्हापुर रस्त्यावर सुख नदी पासुन वैभववाडीच्या दिशेने ५० ते ६० मिटर अंतरावर होते. घटनास्थळ पंचनामा ०४.०० वाजता सुरु करुन ४० मिनिटांनी संपवला. पोलीसांनी घटनास्थळी मोजमाप केले. त्या ठिकाणी पांढ–या साईड पट्ट्यावर रक्ताचे डाग होते. त्या ठिकाणी त्यावेळी वाहने नव्हती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.पी-१/पीडब्ल्यु-१**

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री.ए.व्ही.चिंदरकर यांच्या मार्फत –</u>**

२. घटनास्थळ राष्ट्रीय महामार्ग आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तेथे वाहनांची वर्दळ असते व लोकांची ये-जा चालु असते. हे म्हणणे खरे आहे की, सचिन रावराणे व रामचंद्र रावराणे माइ-या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की,

पंचनाम्याकरिता हजर राहण्यासाठी पोलीसांनी मला लेखी नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पोलीसांनी दाखविले.

प्रश्न - पोलीसांनी पंचनामा कागदावर लिहला व त्यावर तुम्ही फक्त सही केली.

उत्तर - वाचुन सही केली.

३. पंचनाम्यातील सर्व मजकुर मला सांगता येईल. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील सर्व मजकुर मला सांगता येईल हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत व फिर्यादी माइ-या गावातले असल्याने मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी मी पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन मी सही केली व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.07.08 18:31:58 +0530

(शुभम जी. लटुरिया)
न्यायअधिकारी ग्रामन्यायालय,
वैभववाडी.

दिनांकः०८/०७/२०२६

**निशाणी क्र.२७**

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी
मी प्रतिज्ञा पुर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – सचिन दौलत रावराणे, |
| वय | – ३५ वर्ष, |
| धंदा | – नोकरी, |
| राहणार | – येडगाव इनामदारवाडी, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग. |

**<u>शपथेवर सरतपास सरकार तर्फे सहाय्यक सरकारी वकिल श्री.ए.ए.उल्हाळकर, यांचे मार्फत–</u>**

१. घटना दिनांक ०२.०४.२०२४ रोजी घडली होती. सदर दिवशी माझे काका रामचंद्र अखाराम रावराणे यांचा अपघात झाला होता. त्यांचा अपघात कोल्हापुरहुन वैभववाडी कडे येणा–या रस्त्यावर, सुखनदी ब्रिजजवळ झला होता. त्यांना ट्रकने धडक दिली होती. माझे काका चालत वैभववाडीहुन येडगाव येथे जात होते. सदरच्या ट्रकने एका दुचाकी वाहनालाही धडक दिली होती. सदर दुचाकी जवळ तीन इसम बोलत थांबले होते. मी येडगाव येथुन वैभववाडीला येत होतो. त्यावेळी मी अपघात झाल्याचे पाहिले. मी माझ्या–या काकांना वैभववाडीला येथील सरकारी दवाखान्यात घेवुन गेलो. तेथील डॉक्टरांनी कणकवली येथे घेवुन जाण्यास सांगितले. कणकवली येथील सरकारी दवाखान्यात माझ्या–या काकांना दाखल केल्यानंतर मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ट्रक चालकाचे नाव मला कळाले नाही. तो पळुन गेला होता. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. सदर ट्रकचे नोंदणी क्र.एम.एच.११ वाय २७३ असा होता.

२. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.पी-२/पीडब्ल्यु-२** देण्यात येते.

३. मी दुस-या दिवशी पोलीस ठाण्यात परत गेलो होतो. फिर्याद देताना माइ-या काकांचे नाव रामचंद्र आत्माराम रावराणे असे चुकून दिल्याने रामचंद्र अखाराम रावराणे असे असल्याबाबत सांगण्यासाठी गेलो होते. पोलीसांनी माझा तसा पुरवणी जबाब नोंदविला. आता मला पुरवणी जबाब. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.पी-३/पीडब्ल्यु-२** देण्यात येते.

४. मला छापील खबर दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.पी-४/पीडब्ल्यु-२** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री.ए.व्ही.चिंदरकर यांच्या मार्फत –</u>**

५. मी सिधंदुर्ग बँकेत नोकरीस आहे. माइ–या कामाची वेळ सकाळी १०.०० ते सांयकाळी ०५.०० अशी आहे. माइ–या राहत्या घरापासुन घटनास्थळ अर्धा किमी. अंतरावर आहे. माझे काका रामचंद्र यांच्या घरी त्यांची पत्नी असते. माझे काका बँकेत नोकरी करत होते. कणकवली येथे डॉक्टरांनी त्यांनी रात्री ०९.४५ वाजताच्या सुमारास मयत घोषीत केले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर ०२.०० वाजेच्या सुमारास त्यांचा मरणोत्तर पंचनामा झाला व त्यानंतर पोस्टमार्टम झाला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी त्यांची ओळख मी घातली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी काकांची बॉडी घेवुन वैभववाडी येथे आलो. मी सकाळी ०६.०० वाजता घरी आलो. हे म्हणणे खरे नाही की, रात्री ०८.०० ते सकाळी ०६.०० या दरम्यान माझी व पोलीसांची भेट झाली नाही.

६. माइ-या सरतपासातील मजकुर की,"मी अपघात पाहिले" हे मी पोलीसांना जबाब देते वेळेस सांगितले होते. सदर मजकुर माइ-या जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, माइ-या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. मी फिर्याद दिल्यानंतर ती वाचली होती. मी त्यावेळी काकांचे नाव चुकले आहे असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळी फिर्याद दिली नव्हती म्हणुन काकांचे नाव चुकले आहे असे त्याच वेळी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही मी खोटी फिर्यादी दाखल करुन खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा गुन्हृयाशी संबंध नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SHUBHAM GOVIND LATURIYA

Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2026.07.08 18:32:05 +0530

(शुभम जो. लटुरिया)
न्यायअधिकारी ग्रामन्यायालय,
वैभववाडी.

दिनांकः०८/०७/२०२६